# सांगोला तालुका  शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके ४४ वा स्मृती समारोह

## वक्तृत्व स्पर्धा
## सन-२०२५




प्रति,

____________________

____________________

____________________

✻ प्रेषक ✻

**श्री. अ. ल. गायकवाड**

प्राचार्य

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज, सांगोला

## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके ४४ वा स्मृती समारोह

## वक्तृत्व स्पर्धा सन-२०२५



प्रति,

मा. प्राचार्य/मुख्याध्यापक

यांना स.न.वि.वि.

महोदय,

परमपूज्य कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके म्हणजे सांगोल्यासारख्या उजाड माळरानावर विद्यार्थीरूपी चकोरांची ज्ञानतृष्णा भागविणारा एक सुधांशू, अखंड परिश्रम, दुर्दम्य आशावाद, कमालीचा साधेपणा व मनाचा सच्चेपणा यांचे मुर्तिमंत प्रतिक !

राष्ट्रपिता महात्मा गांधी व गांधीवाद यावर प्रचंड निष्ठा असणारे, देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून ब्रिटीशांचा कारावास भोगणारे, समाजऋणाची सर्वथैव जाणीव असणारे व विद्यार्थ्यांच्या मनावर व व्यक्तिमत्वावर रचनात्मक संस्कार करण्यातच आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानणारे बापूसाहेब म्हणजे आमच्या मनाच्या गाभाऱ्यातील शिवमंगल मूर्ती ! आपल्या कर्तृत्वाने मातीलाही गंधित करणारी ही माणसंच समाजाला पुढं नेत असतात.

या ज्ञानियाच्या तेजाला, ज्ञान प्रकाशाच्या पूजकाला व सरस्वतीच्या पुत्राला त्रिवार अभिवादन !

परमपूज्य कै. बापूसाहेब झपके यांच्या ४४ व्या स्मृतीसमारोहानिमित्त आम्ही तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करीत आहोत. या स्पर्धेसाठी आपल्या प्रशाला व ज्युनि.कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी सहभागी होण्यासाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आपल्या उदंड प्रतिसादाची अपेक्षा.

## स्पर्धेची माहिती

| | | | |
|---|---|---|---|
| गट १ ला<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(जिल्हास्तरीय) | इ. ११ वी व १२ वी (विषय)<br>१. शिक्षणातून समाज घडविणारे युगपुरूष-<br>कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके<br>२. मी आणि माझे वाचन प्रेम<br>३. कृत्रिम बुध्दिमत्ता (AI)<br>४. संताचे विचार सामाजिक फलश्रुती | मंगळवार<br>दि.०९.०९.२०२५<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>७+१<br>मिनिटे |
| गट २ रा<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(जिल्हास्तरीय) | इ. ८ वी ते १० वी (विषय)<br>१. कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके-आधारवड<br>२. भविष्याची शिदोरी-संस्कार,शिक्षण<br>३. सावधान निसर्ग कोपतोय<br>४. मैदानी खेळ हरवले, मोबाईलचे खेळ फुलले | मंगळवार<br>दि. ०९.०९.२०२५<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>६+१<br>मिनिटे |
| गट ३ रा<br>वक्तृत्व स्पर्धा<br>(तालुकास्तरीय) | इ. ५ वी ते ७ वी (विषय)<br>१. माझे आदर्श-<br>कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके<br>२. मोबाईल हटवा-बालपण वाचवा<br>३. आई बाबा थोडा वेळ द्याना !<br>४. मैदान घडविते जीवन | बुधवार<br>दि.१०.०९.२०२५<br>सकाळी ११.००<br>वा. | कालावधी<br>५+१<br>मिनिटे |

## प्रत्येक गटातील स्पर्धकासाठी पारितोषिके

| नं. | पारितोषिके | जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा | | तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा |
|---|---|---|---|---|
| | | गट ११ वी, १२ वी | गट ८ वी ते १० वी | गट ५ वी ते ७ वी |
| १. | प्रथम | ३,०००/- | २,५००/- | २,०००/- |
| २. | व्दितीय | २,०००/- | २,०००/- | १,५००/- |
| ३. | तृतीय | १,५००/- | १,५००/- | १,०००/- |
| ४. | चौथे | १,०००/- | १,०००/- | ७००/- |
| ५. | पाचवे-<br>* जिल्हास्तरीय स्पर्धा सांगोला तालुक्यातील स्पर्धकासाठी)<br>* तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा (ग्रामीण स्पर्धकासाठी) | १,०००/- | १,०००/- | ७००/- |

सर्व यशस्वी स्पर्धकास प्रशस्तीपत्रक व झपके कुटुंबियांकडून
कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृतिचिन्ह

## * स्पर्धेचे नियम *

१) जिल्हास्तरीय इ. ८ वी ते १० वी गट व इ. ११ वी, १२ वी गट वक्तृत्व स्पर्धा मंगळवार दि. ०९.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. सुरू होतील.

२) तालुकास्तरीय इ. ५ वी ते ७ वी गट वक्तृत्व स्पर्धा बुधवार दि. १०.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. सुरू होतील.

३) स्पर्धकास वर नमूद केलेल्या कोणत्याही एका विषयावर ठरवून दिलेल्या वेळेत बोलता येईल.

४) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी प्रत्येक शाळेतून व ज्युनि. कॉलेजमधून दोन स्पर्धकास भाग घेता येईल.

५) वक्तृत्व स्पर्धेतील परगावच्या स्पर्धकांना स्पर्धेच्या दिवशीचा एकेरी प्रवास खर्च दिला जाईल.

६) स्पर्धकांची नावे खाली दिलेल्या गुगल फॉर्मव्दारे भरून दि. ०६.०९.२०२५ पर्यंत पाठवावीत. अधिक माहितीसाठी इ. ५ वी ते ७ वी गटासाठी कु. संध्या तेली मो. ९५०३०४०९१३ इ. ८ वी ते १० वी गटासाठी श्री. उन्मेश आटपाडीकर- ८२७५४४८७०९ आणि इ. ११ वी, १२ वी गटासाठी प्रा. धनाजी चव्हाण- ८२७५०२५१५१ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

७) स्पर्धेचे कामकाज पारदर्शक व बाह्य परीक्षकांमार्फत पार पाडले जाईल.

८) स्पर्धा समितीकडे स्पर्धा नियोजनाचे सर्व अधिकार राखून ठेवण्यात आलेले आहेत.

९) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

१०) वरील स्पर्धा सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनि. कॉलेज सांगोला येथे घेतल्या जातील.

११) जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

१२) प्रवेशिका गुगल फॉर्म, फोनवरून व वॉटस् ॲपव्दारे स्विकारल्या जातील. मात्र स्पर्धेच्या दिवशी मूळ प्रवेशिका प्रिंट काढून भरून आणणे आवश्यक आहे.

१३) प्रवेश अर्ज व स्पर्धेसंबंधीची माहिती पुस्तिका संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१४) सदर स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा स्पर्धा संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी होईल.

तरी आपल्या प्रशालेतील, ज्युनि. कॉलेजमधील स्पर्धक सदर स्पर्धेसाठी पाठवून सहकार्य करावे ही सदिच्छा.

आपला विश्वासू

**श्री. अ.ल.गायकवाड**

प्राचार्य

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व

ज्युनि. कॉलेज, सांगोला

# प्रवेश अर्ज

## सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, सांगोला

आयोजित

# कै. गुरूवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह

**वक्तृत्व स्पर्धा-२०२५**

## वक्तृत्व स्पर्धा दिनांक ०९/०९/२०२५ ते १०/०९/२०२५ पर्यंत

प्रति,
मा. प्राचार्य,
सांगोला विद्यामंदिर व ज्युनि. कॉलेज,
सांगोला

महाशय,
आपल्या शाळेकडील दिनांक ०६/०९/२०२५ रोजीच्या पत्रानुसार आपण आयोजित केलेल्या वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणेसाठी या प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांची गटवार नांवे खालीलप्रमाणे पाठवित आहोत.

शाळेचे / ज्युनि. कॉलेजचे नांव ____________________

____________________

(वक्तृत्व स्पर्धा, तालुकास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ५ वी ते ७ वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

(वक्तृत्व स्पर्धा, जिल्हास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ८ वी ते १० वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

(वक्तृत्व स्पर्धा, जिल्हास्तरीय)

| गट | स्पर्धकाचे नाव | विषय |
|---|---|---|
| ११ वी ते १२ वी | १) ____________<br>२) ____________ | १) ____________<br>२) ____________ |

मुख्याध्यापक/प्राचार्य
शाळेचे/ज्युनि.कॉलेजचे नाव : ____________________